MHAH170046382023

## व्यवसायिक दावा क्र.२/२०२३ मधील नि.११ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होऊन मिळणेकरीता दिलेला आहे. त्यांनी अर्जात असे कथन केले की, त्यांना काही महत्त्वाची माहिती व कागदपत्रे वेळेत मिळून न आल्याने कैफियत दाखल करण्यास उशीर झालेला आहे. त्यांनी जाणूनबुजून उशीर केलेला नाही. करीता प्रतिवादींनी दिलेली कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

२. वादीने सदर अर्जावर नि.१३ अन्वये म्हणणे दिले असून त्यांनी प्रतिवादीचे कथन नाकारले आहे. प्रतिवादीस दि.०३.०१.२०२४ रोजी समन्स लागले असून सर्व कागदपत्रे प्रतिवादीच्या ताब्यात आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ अनुसार प्रतिवादीने समन्स लागल्यापासून तीस दिवसांमध्ये त्यांचे म्हणणे दाखल करणे गरजेचे आहे. त्यानंतर जर प्रतिवादीस म्हणणे दयायचे असेल तर न्यायालयाच्या परवानगीने तसेच खर्च आकारुन म्हणणे अभिलेखावर घेता येते जे जास्तीत जास्त १२० दिवसाच्या आत असेल. करीता प्रतिवादी हा विहित मुदतीत म्हणणे देण्यास असमर्थ ठरला असून प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. अर्ज, वादीचे म्हणणे व प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर प्रतिवादी यांना दि.०३.०१.२०२४ समन्स लागल्यानंतर ते दि.१९.०१.२०२४ रोजी प्रकरणात हजर झाले व त्यांनी मुदतीचा अर्ज दिला. त्यानंतर त्यांनी दि.२९.०२.२०२४ रोजी दिलेला अर्ज नामंजूर

करण्यात आला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार समन्स लागल्यानंतर ३० दिवसांमध्ये कैफियत दाखल करणे अभिप्रेत आहे. त्यानंतर दि.१३.०३.२०२४ रोजी त्यांच्या विरुध्द विना कैफियत आदेश पारित करण्यात आला. सदर अर्ज त्यांनी दि.०३.०४.२०२४ रोजी दिलेला आहे. त्यांनी दिलेले कारण संयुक्तिक नसले तरी दोन्ही पक्षांमधील वाद गुणदोषावर निकाली काढण्याकरीता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. परंतू विना कैफियत आदेश सेट असाईड करणे गरजेचे आहे त्याचबरोबर झालेल्या उशीराबददल खर्च आकारणे योग्य होईल. करीता वरील विवेचनावरुन खालील आदेश करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. प्रतिवादीचा अर्ज खर्च रक्कम रु.५००/– आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

राहाता.
दि.०४.०५.२०२४.

(आदिती आर. नागोरी)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
राहाता